# रयत शिक्षण संस्था,सातारा.

शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे मुख्य साधन आहे हे ओळखून पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सन 1919 मध्ये रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज त्या रोपट्याचे रुपांतर एका वटवृक्षामध्ये झालेले असून, भारत सरकारचे विद्यमान कृषी मंत्री मा.नामदार शरदराव पवारसाहेब यांचे नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील 14 व कर्नाटकातील एका जिल्ह्यांतून 42 वरिष्ठ महाविद्यालये, 438 माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये , 8 अध्यापक विद्यालये, 42 प्राथमिक शाळा , 31 पूर्वप्राथमिक शाळा , 8 आश्रमशाळा आणि 2 औद्योगिक प्रशिक्षण संस्थाद्वारे बहूजन, दलित, आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक जीवनामध्ये शिक्षणाच्या माध्यमातून उच्च दर्जाचे परिवर्तन घडवून आणण्याचा यज्ञ अविरत चालू आहे. संस्थेच्या विविध शाखांमध्ये शिकत असलेल्या सुमारे साडेचार लाख विद्यार्थ्यांना आजच्या काळाशी सुसंगत, समाजाभिमुख आणि आधुनिक शिक्षण देऊन महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षि छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत घडविण्यासाठी संस्थेमार्फत विविध उपक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत.

संस्थेमार्फत साहित्य खरेदी, बांधकाम, छपाई कामकाज, कायदेविषयक बाबी, नेमणुका इत्यादी बाबत वर्तमानपत्रात वेळोवेळी जाहिराती दिल्या जातात. सन 2019-20 साठी जाहिरात एजन्सी नेमणूकीबाबत निविदा प्रसिध्द करीत आहोत. त्याबाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

# रयत शिक्षण संस्था,सातारा
## जाहिरात एजन्सी निविदा सन 2019-20
## नियम व अटी

1. जाहिरात स्थानिक, प्रादेशिक, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील सर्व वृत्तपत्रातून प्रसिद्ध करण्याची क्षमता असावी.
2. विहित नमुन्यातच ऑनलाईन टेंडर फॉर्म भरावा. निविदा फॉर्मची किंमत रू.1000/- रोखीने सचिव, रयत शिक्षण संस्था,सातारा यांचेकडे जमा करावी. निविदा खाली निर्देशित केल्याप्रमाणे दोन स्वतंत्र Bid मध्ये भरावयाची आहे. (Technical Bid व Financial Bid)

   अ) **Technical Bid** मध्ये खालील प्रमाणित केलेली कागदपत्रे असावीत.

      1. इन्कमटॅक्स क्लिअरन्स सर्टिफिकेट
      2. जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र
      3. शॉपॲक्ट लायसन्सची झेरॉक्स प्रत.
      4. काम समाधानकारक असल्याचे उपभोक्त्यांचे प्रमाणपत्र
      5. सर्व अटी मान्य असलेबाबतचे संमतीपत्र.
      6. स्थानिक,प्रादेशिक,राज्य व राष्ट्रीय पातळीवरील मराठी माध्यम व इंग्रजी माध्यम वृत्तपत्रांचे सध्याचे जाहिरात दरपत्रक.

   ब) **Financial Bid** मध्ये फक्त दिलेल्या निविदा फॉर्ममधील नमुद केलेल्या नमुन्यात दर नमुद करावेत.
3. वृत्तपत्राच्या मंजूर दरानुसार देयके सादर करावी लागतील. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा टॅक्स उदा.सेल्स टॅक्स, सर्व्हिस टॅक्स, व्हॅट इ.चार्जेस दिले जाणार नाहीत.
4. बयाना म्हणून रक्कम रु. 25,000/- ( रुपये पंचवीस हजार फक्त ) सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा यांचेकडे डिमांड ड्राफ्टने जमा करावी. या रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.
5. आपली जाहिरात एजन्सीची निविदा मंजूर झाल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम रू.50000/- राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी स्वरूपात द्यावी लागेल.

पा.नं. 2..

6. जाहिरात कमीत कमी जागेत प्रसिध्द करावी लागेल. जाहिरात कमीत कमी जागेत प्रसिध्द केली नसल्यास जाहिरात बिलाची रक्कम आदा केली जाणार नाही.
7. जाहिरात प्रसिध्दी दिलेल्या मुदतीत व ठराविक वेळेत करणे बंधनकारक राहिल.
8. आर्टवर्क (कलर व कृष्णधवल) दोन्हीही विनाखर्च करुन द्यावे लागेल.
9. जाहिरात बिनचूक असावी. प्रसिध्द केलेली जाहिरात व मंजूर नमुन्याच्या व आकाराच्या तुलनेत चूक असल्यास त्या जाहिरातीचे बील आदा केले जाणार नाही. व नवीन दुरुस्तीसह संपूर्ण जाहिरात प्रसिध्द करण्याची जबाबदारी जाहिरात एजन्सीची राहील.
10. जाहिरातीचे बील संस्थेच्या मागणीप्रमाणे व आवश्यकतेनुसार विभागून द्यावे लागेल.
11. वेळोवेळी वृत्तपत्रांच्या जाहिरातीचे बदललेले दर कळवावे लागतील.
12. जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या 15 दिवसानंतर बीलाचे पेमेंट केले जाईल. बिलासोबत संबंधित वृत्तपत्राची प्रत असणे आवश्यक आहे. तसेच बीलावर संस्थेचा जी.एस.टी. नंबर **27AAATT1566E1ZJ** टाकणे आवश्यक आहे.
13. बिलासोबत जाहिरातीचे दहा अंक देणे बंधनकारक राहिल. अंक मिळाले नाहीत तर बिलाचे पेमेंट केले जाणार नाही.
14. शासकीय नियमानुसार देय बिलावर आयकर कपात करण्यात येईल.
15. जाहिरात बिलावरील डिस्काऊंट दर हे दि.01/04/2019 ते 31/03/2020 पर्यंत आपणावर बंधनकारक राहतील.
16. आपले दरपत्रक मंजूर झाल्याचे कळविल्यानंतर दिलेल्या तारखेस रू.200/-च्या स्टॅप पेपरवर संस्थेस करारपत्र करून द्यावे लागेल. तसेच आपण जर जाहिरात प्रसिध्द करण्यास असमर्थता दर्शविली तर आपली बयाना रक्कम परत केली जाणार नाही. व सदरची जाहिरात अन्य जाहिरात एजन्सीकडून किंवा वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केली जाईल व फरकाची रक्कम आपणाकडून वसूल केली जाईल. तसेच आपणास दोन वर्षासाठी काळ्या यादीत (Black List) घातले जाईल.

पान नं. 3...

17. निविदेच्या अनुषंगाने कोणताही वाद निर्माण झाल्यास इंडियन आरबिट्रेशन ॲक्ट 1940 मधील तरतुदीप्रमाणे संस्था कार्यवाही करेल व आरबिट्रेटरचा निर्णय अंतिम राहील.
18. वरील सर्व नियम व अटीमध्ये बदल करण्याचा तसेच निविदा अंशतः अथवा पूर्णतः रद्द करणे किंवा नाकारणे अथवा मंजूर करणे हा अधिकार मा.सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी राखून ठेवला आहे.

**दि.**

**प्रति,**

**मा.सचिव,**

**रयत शिक्षण संस्था,**

**सातारा.**

**विषय - जाहिरात एजन्सी डिस्काऊंट बाबत (Financial Bid) --**

महोदय,

मी आपल्या रयत शिक्षण संस्थेच्या 01 एप्रिल 2019 ते 31 मार्च 2020 या आर्थिक वर्षातील जाहिरात प्रसिध्दीचे काम करण्यासाठी इच्छूक असून त्याबाबतचे दरपत्रक भरले आहे. त्यानुसार संस्थेस जाहिरात बिलावर ------- टक्के डिस्काऊंट देण्यास तयार आहे.

कळावे.

आपला विश्वासू,

(सही व शिक्का)

दिनांक

**प्रति,**

**मा.सचिव,**

**रयत शिक्षण संस्था,**

**सातारा.**

**यांना,**

**विषय- जाहिरात एजन्सी नेमणेबाबत.**

महाशय,

मी सन 2019-20 करिता जाहिरात एजन्सी नेमणेबाबतच्या निविदेमधील सर्व अटी व नियम वाचलेले असून ते मला मान्य आहेत. सदर अटी व नियमानुसार मी जाहिरात एजन्सीबाबतचे काम करण्यास तयार आहे. तरी कृपया माझी निविदा स्विकारावी, ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

सही व शिक्का